




दैनिक

# डोंगरचा राजा

www.dongarcharaja.com

email:dongarcharaja@gmail.com

संपादक-अनिल वाघमारे Editor-Anil waghmare








बीड (महाराष्ट्र) वर्ष १ ले अंक-६९ शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६ पोस्टल परवाना: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 किंमत २ रु. पाने - ४

BEED (Maharashtra) Vol: 1 Issue:69 Date: FRIDAY 28 August 2026 Postal Permission: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 Rs. 2/- Pages : 4



# नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना मुख्यमंत्र्यांचा धीर

## व्हिडिओ कॉलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साधला थेट संवाद; 'घाबरू नका, शासन तुमच्यासोबत आहे' असा दिला विश्वास

मुंबई / प्रतिनिधी

नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉलद्वारे थेट संवाद साधला. या संवादादरम्यान मुख्यमंत्र्यांनी पर्यटकांची सद्यस्थिती, त्यांच्या अडचणी तसेच सुरक्षिततेबाबतची माहिती जाणून घेतली. संकटाच्या काळात महाराष्ट्र सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास देत त्यांनी पर्यटकांना धीर दिला.





नेपाळमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे काही भागांत पूरस्थिती निर्माण झाली असून, त्याचा फटका तेथे पर्यटनासाठी गेलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनाही बसला आहे. प्रतिकूल हवामान आणि पूरपरिस्थितीमुळे काही पर्यटक अडकून पडल्याची माहिती समोर आल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित पर्यटकांशी थेट व्हिडिओ कॉलवरून संवाद साधला. यावेळी त्यांनी पर्यटकांकडून ते नेमके कुठे अडकले आहेत, त्यांची परिस्थिती काय आहे आणि त्यांना कोणत्या प्रकारच्या मदतीची आवश्यकता आहे, याची माहिती घेतली. पर्यटकांनीही आपली परिस्थिती मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.

'घाबरू नका, शासन तुमच्यासोबत आहे,' असा धीर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पर्यटकांना दिला. अडचणीच्या प्रसंगी नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असा संदेशही या संवादातून देण्यात आला.

महाराष्ट्रातील नागरिक परदेशात अडचणीत असताना राज्य सरकारने त्यांच्या सुरक्षिततेसाठी थेट लक्ष घातल्याने पर्यटक आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपल्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेबाबत चिंतेत असलेल्या नातेवाईकांनाही मुख्यमंत्र्यांच्या या थेट संवादामुळे आश्वासक वातावरण निर्माण झाले आहे.

नेपाळमधील परिस्थितीवर शासन यंत्रणा लक्ष ठेवून असून, अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर समन्वय साधला जात आहे. संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या संवादातून पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना लिफ्टिंग पद्धतीचे गेट बसविण्यासाठी जयसिंग सोळंके यांची अधीक्षक अभियंत्यांशी भेट



बीड / प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर लिफ्टिंग पद्धतीचे उचल गेट बसविण्याच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा युवा नेते जयसिंग सोळंके यांनी बीड येथे लाभक्षेत्र प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता सौ. पल्लवी जगताप यांची भेट घेतली. यावेळी कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना पारंपरिक पद्धतीऐवजी पश्चिम महाराष्ट्रात वापरल्या जाणाऱ्या लिफ्टिंग पद्धतीचे उचल गेट बसविल्यास उपलब्ध पाण्याचा अधिक प्रभावीपणे वापर करता येऊ शकतो. तसेच नदीतील पाणी अडवून ते शेतीसाठी उपलब्ध करून देण्यास मोठी मदत होणार असल्याचे सोळंके यांनी अधोरेखित केले.

या पद्धतीची गेट बसविल्यास वडवणी तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा लाभ मिळू शकतो. पाण्याची उपलब्धता वाढल्याने शेती उत्पादनाला चालना मिळण्यासोबतच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासही हातभार लागेल, अशी अपेक्षा जयसिंग सोळंके यांनी व्यक्त केली.

कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना अशा प्रकारचे गेट बसविण्याचा प्रस्ताव आणि त्यासंदर्भातील तांत्रिक बाबींचा सकारात्मक विचार व्हावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा असून, यासाठी आवश्यक तो पाठपुरावा सुरू ठेवणार ▶▶पान २ वर

# उजनीचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणा; आमदार भीमराव धोंडे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

आष्टी /अण्णासाहेब साबळे

कृष्णा खोरे अंतर्गत उजनी धरणातून आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावात पाणी आणण्याची प्रलंबित योजना जलद गतीने पूर्ण करावी, अशी मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर (का.) विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव आनंदराव धोंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी २५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे.



आष्टी तालुका कायमस्वरूपी दुष्काळी व पाणीटंचाईग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. अनिश्चित पावसामुळे शेती, पिण्याचे पाणी तसेच पशुधनाचा प्रश्न गंभीर होत आहे. या परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उजनी धरणाचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणणे अत्यावश्यक असल्याचे आमदार धोंडे यांनी पत्रात नमूद केले आहे.

उजनी धरण ते खुंटेफळ साठवण तलावापर्यंत पाणी आणण्यासाठी आवश्यक उपसा सिंचन योजना, पाइपलाइन, जलवाहिनी आणि अन्य संबंधित कामांना तातडीने गती देण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच हा प्रकल्प विशेष प्राधान्याचा म्हणून हाताळून प्रलंबित कामांसाठी वाढीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

योजनेच्या प्रगतीचा नियमित आढावा घेऊन संबंधित विभागांना कालबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, असेही पत्रात म्हटले आहे. खुंटेफळ तलावात उजनीचे पाणी उपलब्ध झाल्यास आष्टी तालुक्यातील शेती, पिण्याचे पाणी, पशुधन तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होणार असल्याचे आमदार धोंडे यांनी स्पष्ट केले.

## आ.सुरेश धस यांचा विकासाचा झंझावात सुरूच!

# ९ कोटी १७ लाखांचा निधी मंजूर, ७९५ हेक्टर क्षेत्राला मिळणार सिंचनाचा लाभ

आष्टी / प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जुन्या कडी व कांबळी धरणांच्या दुरुस्तीबरोबरच त्यांच्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ९ कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार सुरेश धस यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर निधी मंजूर झाला असून, या दुरुस्तीमुळे कालव्यांच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या कामामुळे सुमारे ७९५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत ही कामे करण्यात येणार आहेत. अनेक वर्षांपासून जुने झालेले हे प्रकल्प तसेच कालव्यांमधून मोठ्या प्रमाणात होणारी पाणीगळती यामुळे उपलब्ध पाणी शेवटच्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नव्हते. त्यामुळे दुरुस्तीची मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने केली जात होती.

धानोरा गावाजवळील कांबळे प्रकल्पाचे बांधकाम १९५८ मध्ये करण्यात आले होते. या प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र ५०.२५० चौरस किलोमीटर असून, साठवण क्षमता २.०७७ दशलक्ष घनमीटर आणि उपयुक्त पाणीसाठा २.०५ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाची लांबी १,५०० मीटर, तर सांडव्याची लांबी २७७.४० मीटर आहे.

जुना प्रकल्प असल्याने धरण तसेच कालव्यातून मोठ्या प्रमाणावर पाणीगळती होत होती. परिणामी धानोरा, साबळखेड, शिरपूर आणि कडा परिसरातील शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात सिंचनाचे पाणी मिळत नव्हते.

कांबळी प्रकल्पाचे लाभक्षेत्र १,१०२ हेक्टर, लागवडीलायक क्षेत्र १,०४७ हेक्टर, तर सिंचन योग्य क्षेत्र ९७२ हेक्टर आहे. या प्रकल्पाला ९.६६ किलोमीटर लांबीचा डावा कालवा आहे. धरण व कालवा दुरुस्तीसाठी ३ कोटी ४६ लाख ५६ हजार ७८७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

कडी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम सुमारे सहा दशकांपूर्वी झाले असून, जुन्या दगडी बांधकामामुळे धरण आणि कालव्यांमध्ये पाणीगळतीची समस्या निर्माण झाली होती. सध्या केवळ सुमारे पाच किलोमीटरपर्यंत कालव्याद्वारे पाणी पोहोचत असल्याने शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

कडी मध्यम प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र ९६.२०० चौरस किलोमीटर असून, साठवण क्षमता ७.५८ दशलक्ष घनमीटर आणि उपयुक्त पाणीसाठा ६.३३ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाची लांबी ६९७ मीटर असून सांडव्याची लांबी १५० मीटर आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र १,३१७ हेक्टर असून लागवडीलायक क्षेत्र १,२९० हेक्टर आणि सिंचन योग्य क्षेत्र १,०८४ हेक्टर आहे.

दुरुस्तीच्या कामामुळे कालव्याची वहन क्षमता वाढून ३९५ हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. कडी मध्यम प्रकल्प धरण व कालवा दुरुस्तीसाठी ५ कोटी ६९ लाख ९० हजार ३३७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

दोन्ही प्रकल्पांच्या दुरुस्तीमुळे पाण्याची गळती कमी होऊन कालव्यांची वहन क्षमता वाढणार आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होऊन कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचण्यास मदत होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनाला मोठा आधार मिळणार असून, दुष्काळी परिस्थितीत सिंचनाच्या दृष्टीने हा निधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या निधीसाठी आमदार सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याने कडी ▶▶पान २ वर

# १२ मध्ये २३ लाख रुपये विकासकामांचा माजी नगराध्यक्ष राजाभाऊ मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ

## नाली बंदिस्ती व सिमेंट रस्त्यामुळे नागरिकांना मिळणार मोठा दिलासा



वडवणी / प्रतिनिधी

वडवणी शहराच्या विकासाला चालना देताना दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत वार्ड क्रमांक १२ मध्ये तब्बल २३ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा शुभारंभ गुरुवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात करण्यात आला. या विकासकामांमुळे अनेक दिवसांपासून रस्ता व नालीच्या समस्यांना सामोरे जाणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

वार्ड क्रमांक १२ मधील हनुमंत डिगे यांच्या घरापासून अर्जुन भंडारे यांच्या घरासमोरील परिसर तसेच विलास ढोले यांच्या घराकडील नाली बंदिस्त करण्याचे काम या विकासकामांतर्गत करण्यात येणार आहे. यासोबतच परिसरातील काँक्रिटीकरण आणि सिमेंट रस्त्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात निर्माण होणारे साचलेले पाणी, चिखल तसेच उघड्या नाल्यांमुळे होणाऱ्या अडचणी कमी होऊन नागरिकांची दळणवळणाची सुविधा अधिक सुलभ होणार आहे.

या विकासकामाचा शुभारंभ वडवणी नगरीचे माजी नगराध्यक्ष राजाभाऊ मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथराव म्हेत्रे, नगरसेवक सुधीरभाऊ ढोले, विठ्ठलराव भुजबळ, माजी नगरसेवक शिवाजी टकले, गुरुप्रसाद गुरसाळी, सुरेश ढवळशंख, अर्जुन भंडारे, पत्रकार शंकर झाडे, गणेश कुरकुटे, गणेश म्हेत्रे, राहुल टकले, सुनील ढोले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विकासकामे दर्जेदार आणि नियोजित पद्धतीने पूर्ण करण्याची गरज व्यक्त केली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत रस्ते, नाली, पाणी, स्वच्छता यांसारख्या प्रश्नांवर सातत्याने काम होणे आवश्यक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

नागरिकांची अनेक दिवसांची मागणी मार्गी

वार्ड क्रमांक १२ मधील रस्ता आणि नालीच्या कामाची नागरिकांकडून अनेक दिवसांपासून मागणी होत होती. अखेर या मागणीला मूर्त स्वरूप मिळाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नाली बंदिस्त झाल्यामुळे परिसरातील स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीनेही मोठा फायदा होणार आहे. तर सिमेंट रस्त्यामुळे नागरिकांची ये-जा अधिक सोयीची होणार आहे.

विशेषतः पावसाळ्यात होणारा चिखल आणि ठिकठिकाणी साचणाऱ्या पाण्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत ▶▶पान २ वर

# स्वच्छ परळी वैद्यनाथ, सुंदर परळी वैद्यनाथ; नगर परिषदेच्या स्वच्छता अभियानात सहभागी व्हा

## स्वच्छ परळीच्या संकल्पनेत नागरिकांनी सहभागी व्हावे-स्वच्छता सभापती सौ.प्राजक्ता कराड

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

'सुंदर परळी, स्वच्छ परळी' हा संदेश प्रत्यक्षात आणण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. माता-भगिनींसह शहरातील प्रत्येक नागरिकाने 'आपले घर, आपला परिसर' स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प करावा. स्वच्छतेबाबत काही सूचना किंवा कल्पना असल्यास त्या नगर परिषद प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात, असेही आवाहन स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ता श्रीकृष्ण (भाऊड्या) कराड यांनी केले.शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ नगर परिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, आपल्या घरासह परिसर स्वच्छ ठेवावा आणि नगर परिषद स्वच्छता कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आवहन त्यांनी केले आहे.

शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाच्या स्वच्छता विभागाने व्यापक मोहीम हाती घेतली असून, शहरातील सर्वच प्रभागांमध्ये नियमित स्वच्छतेचे काम सुरू आहे. नागरिकांना स्वच्छतेबाबत कोणतीही समस्या किंवा तक्रार असल्यास ती थेट नगर परिषद स्वच्छता विभागापर्यंत पोहोचविता यावी, यासाठी संपर्क क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत. 'तुमची तक्रार... आमची जबाबदारी' या भूमिकेतून नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नगर परिषद प्रशासनाकडून स्वच्छतेला प्राधान्य देण्यात येत आहे. शहरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, विविध प्रभाग तसेच नागरिकांची वर्दळ असलेल्या परिसरात नियमित स्वच्छता करण्यात येत असून, कचरा साचू नये यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून सातत्याने काम केले जात आहे. स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी शहरातील विविध भागांमध्ये जनजागृतीपर बॅनरही लावण्यात आले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजयजी मुंडे साहेब, ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी पी. एस. निगळ, उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागाकडून शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नगर परिषद स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ता श्रीकृष्ण (भाऊड्या) कराड, स्वच्छता निरीक्षक अनंत काळे, विशाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून शहरातील विविध भागांमध्ये नियमित स्वच्छता करण्यात येत आहे. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित ठिकाणी आवश्यक ती कार्यवाही करण्यावर भर देण्यात येत आहे.

शहरातील एखाद्या भागात कचरा साचला असेल, स्वच्छतेची समस्या निर्माण झाली असेल किंवा नगर परिषद स्वच्छता विभागाच्या निदर्शनास आणून देण्यासारखी कोणतीही अडचण असल्यास नागरिकांनी संबंधित संपर्क क्रमांकावर माहिती द्यावी. यासाठी मो. ९४२१८ ३७७७७ (भाऊड्या कराड), मो. ९०२८९५२८२४ (विकी समिदरसवळे), मो. ८६००२१८८०६ (वैभव माने) या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. 'तुमची तक्रार... आमची जबाबदारी'...नागरिकांनी आपल्या परिसरातील स्वच्छतेबाबतची समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, त्यावर नगर परिषद स्वच्छता विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, अशी भूमिका स्वच्छता विभागाने घेतली आहे. त्यामुळे नागरिकांनी समस्या लपवून न ठेवता संबंधित क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छतेसाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा...शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ नगर परिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, घरातील कचरा योग्य पद्धतीने देणे, परिसरात अस्वच्छता होणार नाही याची काळजी घेणे आणि नगर परिषद कर्मचाऱ्यांना सहकार्य करणे आवश्यक आहे. स्वच्छतेची सवय घरापासूनच सुरू झाली तर संपूर्ण शहर स्वच्छ ठेवणे सहज शक्य होईल. माता-भगिनींसह शहरातील प्रत्येक नागरिकाने 'आपले घर, आपला परिसर स्वच्छ व सुंदर' ठेवण्याचा संकल्प करावा. नागरिकांनी स्वच्छतेबाबत चांगल्या सूचना व संकल्पना नगर परिषद प्रशासनाकडे मांडाव्यात, जेणेकरून शहरातील स्वच्छता व्यवस्था आणखी सक्षम करता येईल. चला, सर्व परळीकरांनो संकल्प करूया; आपले परळी वैद्यनाथ स्वच्छ, सुंदर आणि निरोगी बनवूया! नगर परिषद प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांची साथ मिळाल्यास शहरातील स्वच्छतेचा दर्जा अधिक उंचावण्यास मदत होणार आहे. 'सुंदर परळी, स्वच्छ परळी' हा संदेश घेऊन नगर परिषद प्रशासनाकडून जनजागृती केली जात आहे. शहरातील सर्वच प्रभागांतील नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता आपला परिसर स्वच्छ ठेवावा, तसेच इतरांनाही स्वच्छतेबाबत जागरूक करावे, असे आवाहन स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ता श्रीकृष्ण (भाऊड्या) कराड यांनी केले.

# धनगर समाज कर्मचारी महासंघाच्या कार्यशाळा; नुतन केंद्रप्रमुखांचा सत्कार

बीड प्रतिनिधी

धनगर समाज कर्मचारी महासंघ जिल्हा शाखा बीड आयोजित एकदिवशीय विचारमंथन कार्यशाळा बुधवारी शासकीय विश्रामगृहात पार पडली.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी धनगर समाज कर्मचारी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष अंकुश निर्मळ हे होते.प्रमुख मार्गदर्शक होळकरशाही अभ्यासक ,संशोधक रामभाऊ लांडे उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.भवानीशंकर बक्षी रोजनिशी हे महाराजा यशवंतराव होळकर यांचेवरील अस्सल दस्त पुस्तक मानले जाते.अठराव्या शतकात यशवंतराव होळकर व पदरीचा मोठा हुद्देकरी भवानीशंकर हे दोघेही हयात असताना सदर पुस्तक प्रसिद्ध झालेले होते.ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचा दस्त व संदर्भग्रंथ असलेले हे पुस्तक कोठेही उपलब्ध नव्हते.होळकरशाही संशोधक अभ्यासक रामभाऊ लांडे यांनी सदर पुस्तक मराठीत संपादित केले आहे.दुर्ग अभ्यासक कचरू चांभारे यांनी या पुस्तकाचे समीक्षा वाचन करत होळकरशाही इतिहास सांगितला.मान्यवरांच्या हस्ते शिवछत्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त कचरू चांभारे यांचा शिवमुद्रा असलेले नाणे देवून सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक गुणवत्तेला गती मिळावी म्हणून बीड जिपने नुकतीच केंद्रप्रमुख पदोन्नती व विभागीय परीक्षेने केंद्रप्रमुख नियुक्त केले आहेत.महासंघाचे शैक्षणिक कार्य उत्तरदायित्व म्हणून नव नियुक्त वीस केंद्रप्रमुखांचा सत्कार करण्यात आला.

रामभाऊ लांडे यांनी ऐतिहासिक संशोधनामागील अडचणी व साधनांची कमतरता या अनुषंगाने भवानीशंकर बक्षी पुस्तक निर्मितीमागील इतिहास सांगितला. अंकुश निर्मळ यांनी धनगर समाज कर्मचारी महासंघाची सामाजिक व शैक्षणिक कार्य ओळख व पुढील नियोजन सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास घोडके यांनी केले.सूत्रसंचालन आदर्श शिक्षक जालिंदर ठवरे व आभार प्रदर्शन गिरिश भावले यांनी केले.ड रंजित कारंडे, प्रा.चादर, लक्ष्मीकांत अवढाळ,शाम दामुरडे ड कांबळे, मुख्याध्यापक रमेश गाडे ,अमर ढोणे,चंद्रकांत भोंडवे,आशाताई झिगरे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कचरू चांभारे, विकास घोडके, रमेश गाडे,चंद्रकांत डोंगरे, कल्याण घोलप, धापसे सर,बंडू काका भोंडवे,बाळासाहेब गावडे, गिरीश भावले,दिलीप ढोणे,आबुज जनार्दन इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

शैलजा ओव्हाळ पेंडगाव,शेख सलमा आजिजपुरा,भाग्यश्री चव्हाण वडगावगुदा, शिवकन्या कागदे धोंडीपुरा,गोविंद वायकर अशोकनगर,दिलीप नरूटे उमापूर,महादेव वाघमारे परभणीके, राकेश पवार पिंपळवाडी, उद्धव तोंडे मांजरसुंबा,सुरेश गुजाळ कामखेडा, चंद्रशेखर जाधव उदंड वडगाव,दिलीपकुमार सानप लिंबाघणेश,बाबासाहेब तिंदळे घाटसावळी, विश्वनाथ मुंडे नाळवंडी, प्रभुकांत सोन्ने चौसाळा, राजू परदेशी पारगावसिरस, जगदीश बनकर राजुरी,महेश मोटे जेबापिंपरी, अरूण उनवणे खांडे पारगाव.

# ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त केजमध्ये भव्य रक्तदान शिबीर; 'नवजवान कमिटी कुरेशी'चा स्तुत्य उपक्रम



केज। प्रकाश मुंडे

ईद-ए-मिलादुन्नबी या पवित्र सणाचे औचित्य साधून 'नवजवान कमिटी कुरेशी' (केज) तर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खलिफा कुरेशी, समीर कुरेशी, आखिब कुरेशी, गालेफ कुरेशी, आकिब कुरेश, सकलैन कुरेशी, शाहनवाज कुरेशी, फैजान कुरेशी, अरबाज कुरेश, शहेबाज कुरेशी, सलमान कुरेशी, आहाद कुरेशी आणि जैद कुरेशी यांच्यासह नवजवान कमिटीच्या इतर सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (अंबाजोगाई) येथील रक्तपेढी विभागाच्या पथकाने रक्त संकलनाचे काम पाहिले. वैद्यकीय अधिकारी डॉ. साक्षी मॅडम, टेक्निशियन किरण चव्हाण, महादेव गोजडे आणि सौरव सरोदे यांच्या टीमने अत्यंत तत्परतेने आणि उत्कृष्ट वैद्यकीय सेवेचे प्रदर्शन करत शिबीर यशस्वी पार पाडले. आरोग्यसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराचे केज परिसरातील नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

# शिशुगृहातील दोन बालकांच्या कायदेशीर नातेवाईकांचा शोध सुरू

## ३० दिवसांनंतर दत्तक प्रक्रियेबाबत होणार निर्णय

बीड / प्रतिनिधी

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दत्तक प्रक्रियेच्या अनुषंगाने एक महत्त्वाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिशुगृहात दाखल असलेल्या बालिका आयारा आणि बालक भार्गव या दोन बालकांच्या पालकांचा अथवा कायदेशीर नातेवाईकांचा शोध घेतला जात असून त्यांच्यासाठी ही जाहीर प्रसिद्धी देण्यात आली आहे.





जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिका आयारा ही बालिका १७ एप्रिल २०२५ रोजी शिशुगृहात दाखल झाली आहे. तर बालक भार्गव हा बालक २३ डिसेंबर २०२४ रोजी शिशुगृहात दाखल झाला आहे. या दोन्ही बालकांची माहिती आणि छायाचित्रे दत्तक प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली आहेत. तत्पूर्वी कायद्यानुसार त्यांच्या मूळ पालकांचा किंवा नातेवाईकांचा शोध घेणे आवश्यक असल्याने प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी आवश्यक पुराव्यांसह कार्यालयांशी संपर्क साधावा. जर दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत कोणीही नातेवाईक समोर आले नाहीत, तर बालकल्याण समिती या बालकांच्या भविष्याबाबत आणि दत्तक प्रक्रियेबाबत कायद्यानुसार योग्य तो पुढील निर्णय घेईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महादेव गडदे याना आदर्श समाजभूषण पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई। प्रतिनिधी

मोरफळी येथील समाजसेवक श्री महादेव श्रीराम गडदे यांना दि२६ ऑगस्ट



२६ रोजी न्यु मोरेश्वर बहुउद्देशिय सेवा भावी संस्थे कडून आदर्श समाजभूषण पुरस्कार २०२६ देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूपशाल, मानचिन्ह, सन्मानपत्र पुष्पगुच्छ असे होते,हा पुरस्कार माजी प्राचार्य (योगेश्वरी महाविद्यालय) तथा अध्यक्ष जेष्ठ नागरिक महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती अभय जोशी यांची होती. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रमोद गडदे तसेच मोरफळी,येल्ड, अंबाजोगाई येथील नागरिक, जेष्ठ नागरिक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मधुकर गडदे (बापू) यांनी उत्स्फूर्तपणे केले.

# सिरसाळा ग्रामपंचायतीत पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती उत्साहात

सिरसाळा येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज शेतकरी दिनाचे प्रणेते आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आत्मसन्मान मिळवून देणारे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी सरपंच नशीब शेख, कृषी सहाय्यक मीरा टोम्पे-शिंदे, पत्रकार गोरख काळे यांच्यासह ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्याचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले.

# ३५ वर्षानंतर शालेय आठवणींना उजाळा: श्री लक्ष्मणराव जाहेर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील श्री लक्ष्मणराव जाहेर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा तब्बल ३५ वर्षांनंतर नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. २६ ऑगस्ट २०२६ रोजी बीड येथील जालना रोडवरील विठ्ठल साई प्रतिष्ठान येथे दुपारी १२ ते ४ या वेळेत हा कार्यक्रम संपन्न झाला. या मेळाव्याच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर भेटलेल्या बालपणीच्या मैत्रिणींनी शालेय जीवनातील जुन्या आणि सोनेरी आठवणींना उजाळा दिला.

सामाजिक कार्यकर्त्या रुक्मिणी नागापुरे (कळसकर) यांच्या विशेष पुढाकाराने या अनोख्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. लग्नानंतर संसाराच्या व्यापात आणि जबाबदाऱ्यांमध्ये अडकलेल्या महिलांना एक दिवस स्वतःसाठी, स्वतःच्या आनंदासाठी जगता यावा, हा यामागचा प्रमुख उद्देश होता. यासाठी कुमशी, घोसापुरी आणि नामलगाव परिसरातील १९९०-९१ या बॅचच्या (इयत्ता ७ वी, ८ वी आणि ९ वी) माजी विद्यार्थिनींना एकत्र आणण्यात आले.खेळ, शिदोरी आणि मनमोकळ्या गप्पा

तब्बल साडेतीन दशकांनंतर भेटल्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. या सर्वजणींनी संपूर्ण दिवस एकमेकींना गजरे लावून, सुख-दुःखाच्या गप्पा मारत आणि मनमोकळेपणाने संवाद साधत (शेअरिंग करून) बालपणातील ते दिवस पुन्हा अनुभवले.

पारंपरिक खेळ: या वयातही महिलांनी शाळेच्या मैदानावर खेळले जाणारे खो-खो, आंधळी कोशिंबीर आणि पायदोड यांसारखे पारंपरिक खेळ खेळून मनसोक्त आनंद लुटला. सहभोजन: प्रत्येकीने घरून आणलेली 'शिदोरी' एकत्र करून सर्वजणींनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेतला.

रक्षाबंधन व स्नेहभेट: मैत्रिणींनी एकमेकींना राखी बांधून मैत्रीचे हे अतूट नाते अधिक घट्ट केले आणि एकमेकींना स्नेहभेटही दिली.या आनंददायी आणि भावपूर्ण मेळाव्याला मीरा बांड, शिवकन्या बांड, शारदा शेळके, किस्किनदा बांड, मंगल करपे, कांता शिंदे, उषा जाधव, शालिनी नेरे, दैवशाला डोळस आणि रुक्मिणी नागापुरे आदी माजी विद्यार्थिनींची प्रमुख उपस्थिती होती. ३५ वर्षांनंतरचा हा मेळावा सर्वांसाठीच एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

# धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवात पुरुषोत्तम महाराज पाटील यांची किर्तनसेवा

वडवणी/प्रतिनिधी

धुनकवाड येथील ग्रामदैवत श्रीक्षेत्र धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या दहा वर्षांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवाचे यंदाही उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवातील तिसरा श्रावण सोमवारी दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत आवाजाचे जादुगार ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील यांची किर्तनसेवा आयोजित करण्यात आली आहे.

किर्तनसेवेनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन धुनकेश्वर श्रावण महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.धार्मिक वातावरणात होणाऱ्या या महोत्सवामुळे धुनकेश्वर देवस्थान परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होते. महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य ह.भ.प.कृष्णा महाराज भोरकडे यांच्या मृदंग वादनाने व सुप्रसिद्ध गायनाचार्य ह.भ.प. कैलास महाराज पवार व गायनाचार्य ह.भ.प. नारायण महाराज खिल्लारे गुरुजी यांच्या गायनाने मंत्रमुग्ध करणार आहेत.

या महाप्रसादाचे यजमान म्हणून

महादेव राघु करांडे,ज्ञानेश्वर महादेव मुसळे,सुभाष प्रल्हाद कुलकर्णी,शिवाजी भिवा डोंगरे,उत्तेश्वर भगवान मुसळे,बळीराम कुंडलिक भोसले,सत्यभान देवराव यादव,विश्वनाथ वसंत भोसले,राधाकिसन बळीराम यादव,बाबु तात्याराम



साठे,चंद्रकांत शिलांबर खेत्री,भगवान अच्युत कापले

,बंडु भिमराव रुद्रे,रामलिंग महादेव भोसले,रामचंद्र किसनराव डाके,सचिन अशोक गाडे,लहु चंद्रशेन बिटे,भागवत दादाराव यादव,कांताराम विष्णु वाघ

,गणेश पांडुरंग साठे,राम अवधुत सरवदे,तुकाराम एकनाथ कांबळे,शिवनारायण गोविंद यादव,त्रिंबक वैजनाथ यादव,संतोष मुरलीधर डाके,विक्रम शंभु यादव,शरद वैद्यनाथ लगड,दिपक भरत यादव,विष्णू उत्तम यादव,श्रीहरी ज्ञानोबा अंडील,ज्ञानेश्वर विलास सावंत,आसाराम राघु करांडे,श्रीराम विठ्ठल चादर,गणेश व्यंकटी भोसले,शंभु अशोक सावंत,वचिष्ठ गोरख यादव,लालासाहेब पंढरिनाथ यादव,त्रिंबक विश्वनाथ भोसले,लक्ष्मण रामभाऊ यादव,दिपक रामभाऊ ढवळे ,माऊली आनंत सावंत,कृष्णा भगवान वाघमारे,अशोक ठकुबा भोसले,राम विठ्ठल मस्के ,बाळासाहेब ज्ञानोबा बनसोडे,भीमराव धरपडे,विष्णु सुखदेव यादव,दिनानाथ उत्रेश्वर नाईकवाडे.

,साहेबराव गुंडीबा नांदे, रामराव श्रीरंग चौरे,अविनाश नारायण मुसळे, बाबुराव गवाजी सातपुते ,गोरख रामा काळे,दत्ता हरिश्चंद्र ढवळे यांच्यासह धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समिती व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.या धार्मिक सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

**कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना लिफ्टिंग ...**

असल्याचेही सोळंके यांनी सांगितले.

कुंडलिका नदीवरील बंधाऱ्यांना लिफ्टिंग पद्धतीचे उचल गेट बसविले तर या भागातील शेतकऱ्यांना निश्चितच मोठा फायदा होईल. सिंचनाची उपलब्धता वाढवून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे मत जिल्हा परिषदेचे माजी सभापती जयसिंग सोळंके यांनी व्यक्त केले.

------

**आ.सुरेश धस यांचा विकासाचा ...**

व कांबळी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. निधी मंजूर केल्याबद्दल आमदार धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

या महत्त्वपूर्ण कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात सहकार्य केल्याबद्दल राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्णजी विखे पाटील साहेब, जलसंपदा विभागाचे सचिव तसेच अर्थ व नियोजन विभागातील संबंधित अधिकारी यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

तसेच या प्रक्रियेत जलसंपदा विभाग, गोदावरी पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप मॅडम, कार्यकारी अभियंता नखाते साहेब, उपअभियंता पाखरे साहेब व सिनारे साहेब यांचेही मोलाचे योगदान लाभले असल्याची भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली आहे.

---------

**उजनीचे पाणी खुंटेफळ साठवण...**

शेतकरी व नागरिकांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी राज्य शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती आमदार भीमराव धोंडे यांनी केली आहे.

------

**१२ मध्ये २३ लाख रुपये विकासकामांचा माजी...**

होते. नवीन रस्ते आणि नालीच्या कामामुळे या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

२३ लाख रुपयांच्या या विकासकामामुळे वार्ड क्रमांक १२ च्या विकासात आणखी एक महत्त्वाची भर पडली असून, काम पूर्ण झाल्यानंतर परिसराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार आहे. विकासकामाचा शुभारंभ झाल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत काम लवकरात लवकर आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# वारकरी संप्रदायाचे मूळ नवनाथ परंपरेत : ह.भ.प.डॉ.रविदास महाराज शिरसाठ

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीवर नाथ भक्तांचा महामेळा; अखंड हरिनाम सप्ताहाला हजारो भाविकांची उपस्थिती

बीड (प्रतिनिधी): गुरु-शिष्य परंपरा जपणारा नाथ संप्रदाय असून, या परंपरेतूनच वारकरी संप्रदायाचा उदय झाला आहे. गुरु मच्छिंद्रनाथ यांचे शिष्य गोरक्षनाथ, गोरक्षनाथांचे शिष्य गहिनीनाथ, गहिनीनाथांचे शिष्य निवृत्तीनाथ आणि निवृत्तीनाथांचे शिष्य संत ज्ञानेश्वर महाराज अशी ही गुरु-शिष्य परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे वारकरी संप्रदायाचे मूळ नवनाथ परंपरेत असल्याचे अभंग विवेचन ह.भ.प. डॉ. रविदास महाराज शिरसाठ यांनी केले.



श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात तृतीय कीर्तनरूपी सेवा अर्पण करताना ते बोलत होते. त्यांच्या कीर्तनाला हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. टाळकरी, माळकरी, भजनी मंडळी, गायनाचार्य, मृदंगाचार्य यांच्यासह नाथ भक्तांची मोठी गर्दी झाल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. जणू काही श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीवर नाथ भक्तांचा महामेळाच भरल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, साधुसंतांचा मूळ स्रोत वारकरी संप्रदाय आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सावता महाराज, संत गोरोबा कुंभार, संत नगद नारायण महाराज, संत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत माऊली दादा, संत साधूबाबा, संत किसनबाबा आदी संतांची समृद्ध परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या संत परंपरेचा गाभा वारकरी संप्रदायात असून, वारकरी संप्रदायाची आध्यात्मिक पाळेमुळे नवनाथ संप्रदायात असल्याचेही डॉ. शिरसाठ यांनी स्पष्ट केले. गुरु हा जीवनातील सर्वांत मोठा पाठीराखा आहे.गुरुचा आशीर्वाद आणि मार्गदर्शन लाभले तर जीवनातील कितीही मोठ्या संकटाला सामोरे जाण्याचे बळ मिळते. गुरुचा पाठिंबा असताना अन्य कोणाच्याही आधाराची आवश्यकता भासत नाही. गुरु नवनाथ बाबांच्या पाठीशी सद्गुरू किसन बाबा यांचे कृपाशीर्वाद आहेत. गुरु मच्छिंद्रनाथ, गुरु गोरक्षनाथ, गुरु साधूबाबा आणि गुरु किसन बाबा यांच्या कृपाशीर्वादासोबतच गुरु नवनाथ बाबांच्या त्यागातून श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे वैभव आज दिसून येत आहे, असेही डॉ. रविदास महाराज शिरसाठ यांनी सांगितले. अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीवर धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, विविध भागांतून आलेल्या नाथ भक्तांसह भाविकांची मोठी उपस्थिती सप्ताहाचे आकर्षण ठरत आहे.

# रांजेगाव शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप; अनंता कचरत शिक्षण यांचा स्तुत्य उपक्रम




गेवराई (प्रतिनिधी): गेवराई तालुक्यातील रांजेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आज विद्यार्थ्यांसाठी एक आगळा-वेगळा आणि कौतुकास्पद कार्यक्रम पार पडला.

अनंता कचराथ आबुज व शिक्षण प्रेमी यांच्या वतीने शाळेतील गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, पेन, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्याचा समावेश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून -

शेख ऐहमद सर, श्री. खेडेकर सर, कदम सर, आबुज सर, वाघमारे मॅडम

तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी वाढणार असून पालकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे. शेवटी शाळेच्या वतीने अनंता कचरत आबुज आणि सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

खाजगी शाळांच्या जमान्यात जिल्हा परिषदेच्या शाळेकडे लक्ष देणारी अशी सामाजिक खरंच कौतुकास्पद आहे. या मदतीमुळे आमच्या मुलांना शिकण्यासाठी बळ मिळेल - पालकांची प्रतिक्रिया

या स्तुत्य उपक्रमाबद्दल रांजेगाव पंचक्रोशीतून अनंता कचरत आबुज यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आहेरवडगाव येथे शेती दिन संपन्न

बीड/आहेरवडगाव (प्रतिनिधी): महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचा नारळी पौर्णिमा दिवशी जन्मदिवस हा शेती दिन साजरा करण्यात येतो. या अंतर्गत आहेर वडगाव येथील शिंदे वस्ती येथे ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ तावरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अंतर्गत पौष्टिक तृणधान्य कार्यक्रमांतर्गत बाजरी पिकावरील शेतकरी प्रशिक्षण यावेळी घेण्यात आले के एस के कृषी महाविद्यालयाचे डॉक्टर एस पी मोरे यांनी बाजरी पिकावरील अन्नद्रव्य व्यवस्थापन व किड नियंत्रण बाबत मार्गदर्शन केले. उप कृषी अधिकारी प्रशांत नाळपे यांनी पद्मश्री विठ्ठलरावजी विखे पाटील यांच्या शेती क्षेत्रातील योगदानाची व साखर कारखाने चळवळीची माहिती शेतकऱ्यांना दिली त्याचबरोबर सद्यस्थितीत शेतीमध्ये करावयाच्या कामाबाबत माहिती देताना निंबोळी अर्क फवारणी कापूस व सोयाबीन किड नियंत्रण बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली पिकाच्या पाण्याच्या तानासाठी १३.०. ४५ ची १०० ग्रॅम प्रति पंप नुसार फवारणी करण्याबाबत माहिती दिली सहाय्यक कृषी अधिकारी सरिता शिंदे यांनी महाविस्तार ये आय प बाबत माहिती दिली यावेळी प्रल्हाद शिंदे,चंद्रसेन तावरे, अंकुश शिंदे, श्रीराम तावरे, अशोक शिंदे,स्वाती तावरे, विजयकला शिंदे, पल्लवी तावरे,सह अनेक महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या




# बालेपीर परिसरात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

बीड(प्रतिनिधी): बीड शहरात २६ ऑगस्ट रोजी बालेपीर परिसरात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात ८२ रक्तदात्यांनी आपले बहुमूल्य रक्त देऊन सहकार्य केले व यावेळी बीड शहरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती यात बीड शहरातील माजी आमदार सुनील धांडे साहेब, शिवाजीनगर पोलीस स्टेशन पोलीस उप निरीक्षक बल्लाळ साहेब ,ज्येष्ठ नागरिक तथा नगरसेवक माईन मास्टर साहेब, ए आय एम आय एम चे बीड जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ,भाजप अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इरशाद शेख, नगराध्यक्ष लोकप्रतिनिधी शेख मुजीब, स्वच्छता सभापती निजाम शेख, गटनेते फारुख पटेल, नगरसेवक अशपाक इनामदार, राष्ट्रीय काँग्रेस ओबीसी बीड शहराध्यक्ष सय्यद फरहान,नगरसेवक अफसर खान, माजी



नगरसेवक अमर शेख,माजी नगरसेवक मतीन शेख ,सय्यद सादेख सय्यद रियासत, शेख अखिल साहब, बिलाल शेख, सलीम खान, वसीम शेख, सय्यद मसलुद्दीन, सय्यद परवेज, रुबेझ खान, मंजूर मुलसाब, सय्यद इरफान, परवेज बिल्डर, शेख वसीम बुऱ्हाणोद्दीन ,सय्यद, सोहेल, इम्रान शेख,आसिफ सय्यद,आदी मान्यवरांनी उपस्थिती देऊन रक्तदात्यांचे आत्म बल वाढविले . यावेळी आयोजक शेख मोहसीन बुरहानुद्दीन राष्ट्रीय काँग्रेस बीड जिल्हा अध्यक्ष निराधार निराश्रीत विकास विभाग , सोनू सेठ राष्ट्रवादी अल्पसंख्यांक बीड शहर अध्यक्ष युवक अजित दादा पवार गट, राष्ट्रीय कांग्रेस निराधार विभाग चे बीड तालुका अध्यक्ष शेख जहीर अमीर,कार्याध्यक्ष निराधार चे जमील खान सत्तार खान,सोनू फॅन्स क्लब, व बालपिर मित्र मंडळ यांनी परिश्रम घेतले. या शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

---

शुक्रवार । दिनांक २८ ऑगस्ट २०२६

## दैनिक डोंगरचा राजा प्रस्तुत दैनिक प्रश्नमंजुषा उपक्रम

दररोज 10 प्रश्न - स्पर्धा परीक्षेची भक्कम तयारी

खास इयत्ता 2 री वी ते 12 वी विद्यार्थ्यांसाठी

आजचे प्रश्न मनापासून सोडवा आणि अचूक उत्तर निवडा. | उद्या तुमची प्रगती तपासा - किती प्रश्न बरोबर आले ते पाहा. | यशाकडे दररोज एक पाऊल टाका!

विषय : मराठी | इंग्रजी | गणित | बुद्धिमत्ता | सामान्यज्ञान

अधिक माहितीसाठी संपर्क: श्री. अनिल वाघमारे (मुख्य संपादक) 9822548696 | प्रा. भागवत गोंडे (परीक्षा विभाग प्रमुख) 74478 44939

सूचना - १) योग्य पर्याय निवडा व गोल करा २) सर्व प्रश्नांसाठी एक वही करा त्यात प्रश्न लिहून काढा ३) प्रश्नमंजुषा कात्रण कट करा जपून ठेवा.

### इंग्रजी

1) Complete the sentences with a correct noun.
Rain comes from the...
○ (A) water ○ (B) drops
○ (C) God ○ (D) clouds

2) An ____ a day keeps the doctor away.
○ (A) banana ○ (B) apple
○ (C) walnut ○ (D) orange

### मराठी

3) रतनने 5.00 ते 6.00 पर्यंत अभ्यास केला. तर तिने किती मिनिटे अभ्यास केला?
○ (A) 50 मिनिट ○ (B) 60 मिनिट
○ (C) 1 मिनिट ○ (D) 70 मिनिट

4) सकाळी 6.15 नंतर उमाने 30 मिनिटे तिच्या बागेत काम केले. तिने तिचे काम किती वाजता पूर्ण केले.
○ (A) 6:30 ○ (B) 7:00
○ (C) 6:45 ○ (D) 7:15

### गणित

5) साखर :किलोग्रॅमचे :: कापड : ?
○ (A) कापूस ○ (B) शर्ट
○ (C) मीटर ○ (D) लिटर

6) 4 : 9 :: 16 : ?
○ (A) 10 ○ (B) 22
○ (C) 32 ○ (D) 25

### बुध्दीमता

7) 'दासबोध' हा प्रसिद्ध ग्रंथ कोणी लिहिला?
○ (A) संत एकनाथ ○ (B) समर्थ रामदास
○ (C) संत तुकाराम ○ (D) परमानंद

8) संत तुकारामांच्या रचनांचा प्रमुख प्रकार कोणता होता?
○ (A) अभंग ○ (B) पोवाडा
○ (C) लावणी ○ (D) नाटक

### सामान्यज्ञान

9) भारतीय राज्यघटना_____ रोजी अंमलात आली.
○ (A) 26 जानेवारी 1950 ○ (B) 15 ऑगस्ट 1947
○ (C) 26 नोव्हेंबर 1949 ○ (D) 1 मे 1960

10) _____ठिकाणी मिठाचा सत्याग्रह झाला.
○ (A) मुंबई ○ (B) दांडी
○ (C) नागपूर ○ (D) पुणे

### उत्तरसूची

दिनांक - 27/8/2026, वार- गुरुवार

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 - C | 2 - A | 3 - A | 4 - D | 5 - A | 6 - C | 7 - A | 8 - D | 9 - C | 10 - B |

### भाषणाचे 90 सोपे मंत्र

1. **विषय समजा** – काय बोलायचे ते आधी समजून घ्या.
2. **नमस्कार करा** – सुरूवात नमस्काराने करा.
3. **हसतमुख राहा** – चेहऱ्यावर आत्मविश्वास ठेवा.
4. **स्पष्ट बोला** – शब्द नीट आणि हळू बोला.
5. **समोर बघा** – श्रोत्यांकडे पाहून बोला.
6. **हावभाव करा** – योग्य हातवारे वापरा.
7. **विराम घ्या** – घाईघाईने बोलू नका.
8. **मुद्दे लक्षात ठेवा** – पूर्ण भाषण तोंडपाठ करू नका.
9. **आत्मविश्वास ठेवा** – "मी छान बोलू शकतो!" असा विश्वास ठेवा.
10. **सुंदर शेवट करा** – शेवटी "धन्यवाद!" म्हणा.

★ लक्षात ठेवा: समजा → बोला → बघा → हसा → आत्मविश्वास ठेवा!

# हमालांच्या जमिनीवर वारसांचा डोळा?

## तहसीलदार रूईकर यांच्या भूमिकेवर संताप!; गट नं.२५ मधील फेरफारांच्या चौकशी करा; १ सप्टेंबरला आमरण उपोषण करणार – सय्यद सलीमबापु

**माजलगाव । रवी राऊत**

**गरीब हमाल –मापाडी कामगारांनी कष्टाची कमाई एकत्र करून घेतलेल्या मनुर शिवारातील गट नं. २५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या मालकीचा वाद आता चिघळला आहे.या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या कथित फेरफारांवरून तहसील प्रशासनाच्या कारभारावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम(बापू) यांनी तहसीलदारांना निवेदन देत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही,तर १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मनुर शिवारातील गट नं.२५ येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.**



निवेदनातील माहितीनुसार, संबंधित जमीन हमाल–मापाडी कामगारांनी वर्गणी जमा करून तसेच बाजार समितीच्या आर्थिक मदतीतून घेतली होती.तत्कालीन अध्यक्ष मयत भुजाबा खांडेकर यांच्या नावावर खरेदीखत करण्यात आले.त्यानंतर खांडेकर यांनी या जमिनीवर एन.ए.लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखत करून दिला आहे.मात्र, अशिक्षित व निरक्षर असल्याने अनेक हमालांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पी.टी.आर. घेतली; ७/१२ च्या मालकी रकान्यात मात्र त्यांची नावे आली नाहीत.याच त्रुटीचा फायदा घेत खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांनी ७/१२ वर स्वतःची नावे लावून घेतली आहे.या सर्व प्रकारात महसूल यंत्रणेतील तलाठी,मंडळ अधिकारी आणि तहसीलदारांनी चिरीमिरी घेऊन प्रकरण दाबले आहे.संबंधित फेरफार नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाले?हमालांकडे खरेदीखत असताना त्यांच्या मालकीची नोंद का झाली नाही?आणि वारसांची नावे कशाच्या आधारे ७/१२ वर आली? या प्रश्नांची उत्तरे तहसील प्रशासनाने द्यावीत,अशी मागणी सलीम बापू यांनी केली आहे. त्याचप्रमाणे संबंधित जमिनीची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी,हमालांच्या नावांची ७/१२ वर नोंद घ्यावी, कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करावेत आणि गट नं.२५ संदर्भात कोणतेही खरेदीखत होऊ नये, यासाठी दुय्यम निबंधकांना आदेश द्यावेत,अशी मागणी करण्यात आली आहे.गरीब हमालांच्या हक्काचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून महसूल प्रशासन नेमके कोणाची बाजू घेत आहे?असा संतप्त सवाल उपस्थित करत प्रशासनाने निवेदनाची दखल घेऊन कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी न केल्यास १ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे.

## केजचा बुलंद आवाज! सुरज रामकृष्ण घुले यांची भाजयुमो बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे उधाण

केज (प्रतिनिधी): भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) बीड जिल्हाध्यक्ष संजय केशवराव अंधाळे यांनी पक्षाची नवीन जिल्हा कार्यकारिणी अधिकृतपणे जाहीर केली आहे. यामध्ये केज तालुक्यातील टाकळी येथील धडाडीचे व अभ्यासू युवा कार्यकर्ते सुरज रामकृष्ण घुले यांची भाजयुमोच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी वर्णी लागली आहे. या निवडीमुळे संपूर्ण केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील पक्षसंघटनेत आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही महत्वपूर्ण नियुक्ती प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण व महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या खंबीर नेतृत्वात तसेच लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

तसेच खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष मा. कृष्णराज महाडिक, आमदार नमिताताई मुंदडा, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय भैय्या



मुंदडा आणि भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या सूचनेनुसार आणि विश्वासावर ही निवड जाहीर करण्यात आल्याचे अधिकृत पत्रकात नमूद केले आहे.

**पक्षसंघटना बळकट करण्याचा व तरुणांचे प्रश्न सोडवण्याचा संकल्प**

आपल्या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सुरज घुले म्हणाले की, वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. पक्षसंघटन तळागाळापर्यंत मजबूत करणे, भारतीय जनता पक्षाची ध्येय–धोरणे घराघरांत पोहोचवणे आणि जिल्ह्यातील तरुणांचे न्याय्य हक्क व प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव तत्परतेने काम करेन.

**सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव**

केजयच्या एका कार्यक्षम युवा नेत्याला जिल्ह्याच्या कार्यकारिणीत महत्त्वाचे स्थान मिळाल्याने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून सुरज घुले यांच्यावर शुभेच्छांचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली भाजयुमो केज तालुक्यात अधिक आक्रमक व प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## शिवाजीनगर पोलीस ठाण्याचा पुढाकार; रॅलीऐवजी रक्तदानाचा विधायक उपक्रम



बीड (प्रतिनिधी): ईद–ए–मिलाद–उन–नबी निमित्त प्रस्तावित रॅलीच्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याने संबंधित युवक व संयोजकांशी संवाद साधून सकारात्मक व समाजाभिमुख उपक्रमास प्रोत्साहन दिले.

मागील तीन वर्षांपासून शेख मोहसीन व सोनू शेठ यांच्या पुढाकाराने ईद–ए–मिलाद निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी रॅलीचे आयोजन करणाऱ्या युवकांनीही पोलिसांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत रॅलीऐवजी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला. शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या उपक्रमातून युवकांना समाजाभिमुख कार्याशी जोडत सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेचा सकारात्मक संदेश देण्यात आला. या सकारात्मक प्रतिसादाबद्दल संयोजकांनी सहभागी युवक व रक्तदात्यांचे आभार मानले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या या पुढाकारामुळे शहरातील इतर सामाजिक संघटना व विविध गटांनाही जयंती व उत्सवांच्या निमित्ताने समाजोपयोगी व विधायक उपक्रम राबविण्यास प्रेरणा मिळाली आहे.




## चोरीस गेलेले सोने महिलांना परत; रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचा उपक्रम

बीड (प्रतिनिधी): रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला चोरीस गेलेले सोने महिलांना परत मिळवून देत बीड पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपली. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार पोलिसांनी चोरीच्या घटनांचा तत्पर तपास करून हस्तगत केलेले सोने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित महिलांना परत केले. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर चोरीस गेलेले सोने संबंधित महिलांना परत मिळाल्यास त्यांच्यासाठी ही मोठी भावनिक आणि आनंदाची बाब ठरेल, या उद्देशाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांनी अलीकडच्या काळात घडलेल्या चोरीच्या घटनांचा तपास करून चोरीस गेलेले सोने हस्तगत केले आहे.



आज रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांच्या उपस्थितीत व हस्ते दोन पीडित महिलांना त्यांचे सोने परत करण्यात आले. यातील पहिल्या घटनेत राजीव गांधी चौक, बीड येथुन राहते घरातुन सोन्या चांदीचे दागिणे चोरीस गेले बाबतचा गुन्हा दाखल होता सदर गुन्हयाचा पोलिसांनी सखोल तपास करुन तपासादरम्यान एकुण ३,३७,२८०/- रुपये एवढ्या रक्कमेचे सोन्या चांदीणे दागिणे हस्तगत केले आहेत. तर दुसऱ्या घटनेत परळी येथील महिला नामे आरती दिपक अरबुने या महिलेचे बीड बस स्थानक येथे बस मध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेवुन चोरीस गेलेले २८,९८५/- रुपये किंमतीचे सोण्याचे मिनी गंठण पोलिसांनी तत्पर कारवाई करून आरोपीस अटक करुन हस्तगत केले आहे. कायद्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही महिलांना त्यांचे सोने परत करण्यात आले आहे. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला आपल्या कष्टाने मिळवलेले दागिने पुन्हा मिळाल्याने दोन्ही महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब तसेच बीड पोलिसांचे आभार मानले. चोरीस गेलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नागरिकांना परत मिळवून देण्यासाठी बीड पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. ऋषिकेश शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शीतलकुमार बल्लाळ साहेब तसेच पोलीस अंमलदार विलास कांदे, राजाभाऊ जाधव, महिला पोलीस अंमलदार सिमा गायकवाड, रामलीला गुंजाळ, शिवा घोलप, अनंत गिरी, ज्ञानेश्वर मराडे आदींनी केली आहे.













Dongarcha Raja Newspaper Printed, Published and Owned by **Waghmare anil shriram** and Printed at **Shri Jagmitra Printers & Sales Corporation,** Sumati Nagar, Jalna road, Beed, Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and published at Dongarcha raja, Main Road, wadvani, Tq.Wadvani, District Beed. 431144 (Maharashtra) **Editor : Waghmare anil shriram**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **वाघमारे अनिल श्रीराम** यांनी श्री जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कार्पोरेशन, सुमतीनगर, जालना रोड, बीड जि.बीड – पिन– ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून डोंगरचा राजा कार्यालय,मेन रोड, वडवणी, ता.वडवणी जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. फोन – ९४२२५९१८०५, निवासी संपादकः डॉ.एल.बी.वाघमारे, **संपादक- वाघमारे अनिल श्रीराम** (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)